श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, पुणे

श्रीसद्‌गुरू वासुदेवानंतसरस्वती तथा श्री बाबामहाराज सहस्रबुद्धे

# जयंती उत्सव

नोव्हेंबर २०२४ | जयंती उत्सव विशेषांक १ | खासगी वितरणासाठी | पाने १२

## श्रीसद्गुरू बाबामहाराज सहस्रबुद्धे यांचा १४१वा जयंती उत्सव



*।। श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वत्यै नम: ।।*

पुणे येथे श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिरात श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती तथा श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे यांचा १४१वा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. दि. ११ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते आणि त्याला भक्तगणांचा प्रतिसाद अत्यंत उत्साहपूर्ण होता. दि. ११ ते १३ नोव्हेंबरपर्यंत सकाळी १०.०० ते १२.१५ या काळात ह.भ.प. श्रीपाद अभ्यंकर, ह.भ.प. वासुदेवबुवा हनुमंत जोशी, ह.भ.प. अवंती साठे यांची कीर्तने झाली. दि. ११ ते १३ नोव्हेंबर, सायंकाळी प्रा. शिरीष लिमये यांचे 'रामकृष्ण परमहंस' या विषयावर आणि दि. १५ नोव्हेंबर रोजी आचार्य पद्मनाभ व्यास यांचे 'श्रीसद्गुरू बाबामहाराजांची आरती' या विषयावर प्रवचन आयोजित करण्यात आले होते.

**गुरुवार, दि. १४ नोव्हेंबर २०२३; कार्तिक शु।। १४, शक १९४६**

रोजी सकाळी ध्वजपूजनाने उत्सवाच्या मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषद पठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन, दुपारी ह.भ.प. श्रेयस कुलकर्णी यांचे कीर्तन, महाप्रसाद आदी कार्यक्रमानंतर सायंकाळी पाठांतर स्पर्धा पारितोषिक आणि पाठशाळेच्या परीक्षांचे प्रमाणपत्र वितरण; तसेच विद्वज्जनांचा सत्कार यासाठी एका समारंभाचे आयोजन केलेले होते.

**पारितोषिक आणि प्रमाणपत्र वितरण तसेच विद्वज्जनांचा सत्कार समारंभ**

गुरुवार, दि. १४ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता विद्वत् सत्कार आणि पाठांतर स्पर्धा आणि वेदपाठशाळा परीक्षांचे निकाल आणि पारितोषिक वितरण समारंभ प्रतिवर्षाप्रमाणेच आयोजित करण्यात आला होता. या समारंभाचे अध्यक्ष म्हणून




*डावीकडून : पण्डित प्रवर एम्. विनायकउडुप, पण्डित प्रवरडॉ. वंशीकृष्ण घनपाठी, श्री. विकासराव वालावलकर, वेदमूर्ति श्रीनिधी स्वानंद धायगुड*

पण्डित प्रवरडॉ. वंशीकृष्ण घनपाठी, म्हैसुर यांना निमंत्रित करण्यात आले होते.

समारंभाच्या प्रारंभी वे.मू. प्रथमेश पुरोहित आणि वे.मू. मंदार क्षीरसागर यांनी ईशस्तवन केले. सूत्रसंचालक वे.मू. प्रसाद निगुडकर यांनी समारंभाचे नियोजित अध्यक्ष पण्डित प्रवर डॉ. वंशीकृष्ण घनपाठी यांचा विस्तृत परिचय करून दिला आणि त्यांना अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती करून त्यांच्या अनुमतीने प्रास्ताविक केले.

प्रास्ताविक करताना वे.मू. निगुडकरगुरुजी म्हणाले, ''अभ्यास करावा आधी । ताळबंध पाठांतरे ।। अत्यंत साक्षेपी व्हावे । न व्हावे आळशी ।।'' असे संत रामदासांचे वचन आहे. प्रत्येकाने रोज काही-ना-काही अध्ययन आणि त्याचे मनन-चिंतन केले पाहिजे. आजच्या तंत्रयुगात सस्वर पाठांतर करण्याची प्रथा लुप्त होत आहे. परीक्षेसाठी पाठांतर केले जाते. पूर्वी रामरक्षा, मनाचे श्लोक अशा गोष्टींचे पाठांतर केले जायचे. आता त्याला पोपटपंची म्हटले जाते. खरेतर पाठांतरामुळे उच्चार स्पष्ट होतात, वाणी सुधारते. आपल्या षट्चक्रांवर चांगला परिणाम होतो आणि त्यांचे आरोग्य उत्तम राखले जाते.

आणि म्हणूनच श्रीसहजानंदसरस्वतीमहाराजांनी पुण्यात वे.मू. किंजवडेकरशास्त्री आणि वे.मू. सप्रेगुरुजी यांना सोबत घेऊन संस्कृतचे अध्ययन सुरू केले. महाराजांच्या मनात संस्कृत विद्यापीठ काढण्याचाही विचार होता. यावरून संस्कृत भाषेला पुन्हा चांगले दिवस येणार आहेत हे लक्षात येते.

जीव्हादोष जावा आणि स्मरणशक्ती वाढावी यासाठी श्रीमहाराजांनी पाठांतर स्पर्धा सुरू केल्या. ते कार्य पुढे श्रीकाकामहाराजांनी मोठ्या प्रमाणात वाढवले आहे. या वर्षी ऋग्वेद संहिता, उपग्रंथ, पद, क्रम, जटा, घनपाठ, कृष्ण यजुर्वेद, शुक्ल यजुर्वेद, माध्यांदिन कण्व, सामवेद राणायनी, जेमिनी शाखा, अथर्ववेद, ऋग्वेद स्मार्त याज्ञिक शाखा यासमवेत मंदिरात येणाऱ्या भक्तगणांच्या मुलांसाठी गुरुपरंपरेच्या आरत्या, अष्टके, भगवद्गीता, मनाचे श्लोक आदींच्या पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. महाराष्ट्रासहित तामिळनाडू, आंध्र प्रदेश, गोवा, कर्नाटक आदी राज्यातील आणि उज्जैनी, तिरुपती, अजमेर आदी ठिकाणांहून दोनशेपेक्षा जास्त स्पर्धकांनी भाग घेतला. विद्वान परीक्षकांनी त्यांची दहा दिवस परीक्षा घेतली. विशेष म्हणजे, या पाठशाळेचे विद्यार्थी वे.मू. मंदार क्षीरसागर 'घनपाठ' परीक्षा विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाले.



सूत्रसंचालक वे.मू. प्रसाद निगुडकर



वे.मू. मंदार क्षीरसागर आणि वे.मू. प्रथमेश पुरोहित

संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन अध्यक्षांचे स्वागत केले आणि त्यानंतर अध्यक्ष महोदयांनी आपले स्थान ग्रहण केले.

श्री. रवींद्र संत यांनी 'पाठांतराचे महत्त्व' या विषयावर पाठांतरस्पर्धेच्या संदर्भात आपले विचार यानंतर व्यक्त केले. ते म्हणाले, ''प्रतिवर्षाप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या पाठांतर स्पर्धा आणि वेदपाठशाळा परीक्षांचे निकाल तसेच पारितोषिक वितरण समारंभासाठी आपण जमलो आहोत.

भारतीय संस्कृतीमध्ये पाठांतरास अनन्यसाधारण महत्त्व आहे. पाठांतरामुळेच भारतीय संस्कृती जिवंत आहे. यामध्ये गुरु-शिष्य परंपरा वैदिक काळापासून आहे. ब्रह्मदेवाचे शिष्य वेदमहर्षी व्यास यांनी आपले ज्ञान आपले शिष्य पैल, जैमिनी, वैशंपायन, सुमंतुमुनी, रोमहर्षण यांना दिले. ऋग्वेद - पैल मुनी, यजुर्वेद - जैमिनी, अथर्ववेद - वैशंपायन आणि सामवेद - सुमंतमुनी यांच्याकडून मौखिक पद्धतीने पाठ करून पुढील पिढ्यांकडे दिले. गुरुकुल हा प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचा एक प्रकार आहे. गुरुकुलामध्ये शिष्य गुरूच्या जवळ राहून शिक्षित होतो.

आपल्या सद्गुरूंच्या आदेशानुसार सहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांनी वैदिक धर्माच्या संरक्षणासाठी आणि प्रसारासाठी वेदपाठशाळा सुरू केली. या पाठशाळेमधून घनपाठी विद्यार्थी तयार होत आहेत. गेल्याच वर्षी गुरुजी मनोज जोगळेकर यांनी श्रीबाबा महाराजांच्या मंदिरामध्ये ऋग्वेदाचे मुखोद्गत घनपारायण अखंड ५३ दिवसांमध्ये केले. या पारायणप्रसंगी उपस्थित राहून वेदमूर्तींची सेवा आणि पारायणाचे श्रवण करून सांगता सोहळ्यास उपस्थित राहण्याचे भाग्य आम्हास लाभले याचा विशेष आनंद होत आहे. गेली अनेक वर्षे पाठांतर स्पर्धा सुरू आहे. सेवामंडळ ही परंपरा अधिक जोमाने पुढे सुरू ठेवत आहे.

स्वयंसेवकांच्या तीन-तीन पिढ्या या स्पर्धेमध्ये भाग घेऊन पारितोषिके प्राप्त करून घेताना आपण सगळ्यांनी पाहिले आहे. वेदपाठशाळेमध्ये गुरुशिष्य परंपरेनुसार आणि पाठांतराने वेद पुढील पिढ्यांपर्यंत जतन केले जात आहेत.

आपल्या जीवनातील तीनही अवस्था बालपण, तरुणपण, आणि वृद्धावस्थेत पाठांतर आपणास चांगली सोबत करत आहे. बालपणी श्लोक, स्तोत्रे तसेच इतर पाठांतर करण्याच्या निमित्ताने विद्यार्थीदशेत उत्तम प्रगती साधता येते. थोरामोठ्यांकडून प्रोत्साहन आणि शाबासकी मिळून पुढील वाटचालीसाठी बळ मिळते.

तरुणपणी पाठांतराच्या सवयीने वेगवेगळ्या गोष्टी, सूत्रे लक्षात ठेवून नोकरी तसेच व्यवसायात योग्य निर्णय घेण्यास मदत होते आणि करीत असलेल्या कामात उत्तम यश प्राप्त होते. तसेच केलेले पाठांतर वृद्धापकाळी एकांतवास आनंदात घालविण्यात उपयोगी पडते. पुढील तरुण पिढी वृद्ध पालकांना त्यांच्या व्यग्र जीवनशैलीमुळे वेळ देऊ शकत नाही. अशा वेळी पाठ केलेली स्तोत्रे, रचना इत्यादीचे पुन्हापुन्हा पारायण करून वृद्धापकाळ आनंदात व शांततेत व्यतीत करता येतो.

समर्थ रामदासस्वामींनी त्यांच्या अनेक रचनांमधून पाठांतराबद्दल मार्गदर्शन केले आहे. 'पहाटे उठून केलेले पाठांतर चांगले लक्षात राहते' असा ते आपणास उपदेश करतात. त्यांनी जे असंख्य मठ स्थापन केले, त्या मठातील महंतांना दासबोध पाठ करण्यास सांगत. त्यांची परीक्षा म्हणून लिखित दासबोधाची प्रत विखरून पुन्हा तो व्यवस्थित लावण्यास सांगत. पाठ केल्यामुळे दासबोध ते महंत व्यवस्थित लावत असत.

सायंकाळी दिवेलागणीच्या नंतर परवचा म्हणण्याची पद्धत होती. शुभंकरोती, रामरक्षा, मारुती स्तोत्र, अथर्वशीर्ष इत्यादी म्हणण्याची सवय होती, ती पुढे चालू ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे वाणी शुद्ध होते. शुद्ध उच्चार करता येतात. जिभेला चांगले वळण लागते. परवचा म्हटल्यानंतर पाढे, पावकी, निमकी, औटकी, सव्वायकी, दीडकी, अडीचकी पाठ करण्याची पद्धत होती. त्यामुळे आजच्या पद्धतीप्रमाणे कॅल्क्युलेटरचा वापर करावा



*पंडित प्रवर डॉ. वंशीकृष्ण घनपाठी यांचा*
*श्री. विकासराव वालावलकर यांच्या हस्ते सत्कार*



*श्री. रवींद्र संत 'पाठांतराचे महत्त्व' याविषयी बोलताना*

लागत नसे. थोडक्यात पाठांतराने वाणी शुद्ध, बुद्धी तल्लख होते. स्मरणशक्तीमध्ये वाढ होते, व चेहऱ्यावर एक वेगळेच तेज दिसून येते.

यानंतर सूत्रसंचालकांनी सत्कारमूर्ती एम. विनायक उडुप यांचा परिचय करून दिला. कर्नाटकातील 'नाल्कुरू' या आपल्या जन्मगावी प्राथमिक शिक्षण झाल्यावर त्यांनी श्रीसंजीवनी संस्कृत महापाठशाळेत १९९२ ते २००५पर्यंत साहित्य, व्याकरण आणि न्यायशास्त्राचे अध्ययन आणि अध्यापन आस्थान विद्वान ब्रह्मश्री एम. ए. नागराजभट्ट, शृंगेरी यांच्याकडे केले. २००५ साली अध्यापकपदी नियुक्त झालेले विद्वत्प्रवर एम. विनायक उडुप आता याच पाठशाळेचे अध्यक्षही आहेत. त्यांना अर्पण करण्यात येणाऱ्या संस्कृत मानपत्राचे आणि त्याच्या मराठी अनुवादाचे वाचन केले.

मानपत्राचे वाचन झाल्यावर मा. अध्यक्षांच्या हस्ते सत्कारमूर्तींचा पुष्पगुच्छ, विद्वद्वस्त्र, श्रीफळ, मानपत्र आणि महादक्षिणा रु. ५१,०००/- देऊन सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना मा. एम. विनायक उडुप म्हणाले, ''मला हिंदी अथवा मराठी भाषा येत नसल्यामुळे मी संस्कृतमधून बोलत आहे. भारतीय जीवन शैलीत धर्माला खूप महत्त्व आहे. धर्म हाच जगाला तारणारा आहे. 'धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठाः।' आणि धर्माचे मूळ हे वेद आहेत. 'वेदोऽखिलो धर्मः मूलः । श्रुति, स्मृति, पुराणामध्ये सर्वत्र वेदच प्रमाण मानलेला आहे. 'उचैर्जगति सिध्यति धर्मतश्चेत । तस्य प्रमथि वचनैर्कृत एक निश्चेत । तेषां प्रकाशन दशाच मही सुरश्चेत । तान् अंतरेणनिगदै मनुमत् प्रमाणः । असे चंपुरामायणात वेदांचे महत्त्व उदधृत केलेले आहे. धर्ममार्ग आचरणानेच धर्माचे संरक्षण होत असते. म्हणून प्रत्येकाने धर्माचरण केले पाहिजे. धर्माचरण म्हणजे काय? तर वेदाध्ययन, शास्त्राध्ययन आणि शुद्ध आचरण करून समाजाला ज्ञानमार्ग दाखविणे. त्यांनाच पंडित म्हणतात. अशा पंडितांचे सत्कार करण्याची जी प्रथा या मंदिराने पाडली आहे ती सर्व जगाला आदर्शवत आहे. वेदशाळांना आणि छात्रांना प्रोत्साहन

## पण्डित प्रवर – एम्. विनायक उडुप शर्मा

*आज या शुभप्रसंगी पण्डित प्रवर एम् विनायक उडुपशास्त्रींना सन्मानित करताना आम्हास अत्यानंद होत आहे. श्री. लक्ष्मीनारायण व लक्ष्मीदेवी या दंपतीचे ठिकाणी जन्म झालेले श्रीमान् एम्. विनायकशास्त्रींनी कुमारवयातच शास्त्रविद्येच्या कुतूहलाने*
*पण्डितवरेण्य श्री. एम्. ए. पागराजभट्टशास्त्री यांचेकडे शुद्धतर अशी साहित्य-व्याकरण-न्यायशास्त्रविद्या संपादित केली. विद्वत् सभांमध्ये आपल्या घनगंभीर शास्त्रनिरूपणाने इतर विद्वानांना आनंदित केलेत. आपण, शास्त्रअध्यापनाने आमचे परमगुरू श्रीसद्गुरू सहजानंदसरस्वती स्वामी महाराज यांचा वेद-शास्त्रविद्येचे संवर्धन व्हावे हा मनोरथच सफल करीत आहात. त्यांच्याच प्रेरणेने सेवामण्डळ श्रीवासुदेवानन्तसरस्वती स्वामी समर्थ महाराजांच्या जयंती उत्सवाला अनुलक्षून*

**'शास्त्रकलानिधी'**

*ही पदवी व श्रीफल, महावस्त्र व रुपये एकावन्न हजार आपणास अतिशय आनंदाने प्रदान करीत आहोत. भगवत्कृपेने आपणाला दीर्घायुरारोग्य व सच्छिष्य परम्परा प्राप्त होओ व आपला शारदीयकीर्तिचंद्र असाच नित्य शास्त्र नभोमंडलावर झळकत राहो, अशी सद्गुरुचरणी प्रार्थना.*

**भवदीय,**
**अशोक रघुनाथ जोशी**
**विश्वस्त, श्रीसद्गुरू वासुदेवानन्तसरस्वती सेवामंडळ**

*शोभन – कार्तिक शु. १५, शक १९४६*
*दि. १५ नोव्हेंबर २०२४*

देण्याचे वेदकार्य करणाऱ्या या संस्थेच्या गुरुजनांना माझा प्रणाम!

दुसरे सत्कारमूर्ती वे.मू. श्रीनिधी स्वानंद धायगुडे यांचा परिचय करून देताना सूत्रसंचालक म्हणाले, ''वे.मू. श्रीनिधी यांनी वयाच्या केवळ सातव्या वर्षी श्रीशारदापीठम् शृंगेरी येथे संपूर्ण श्रीमद्भगवद्गीता मुखोद्गत परीक्षा देऊन प्रथम श्रेणी प्राप्त केली. पुढे, श्रीकामकोटीपुरम - कांची, श्रीदत्तपीठम - म्हैसूर, श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर पुणे, वेदशास्त्रोत्तेजक सभा अशा अनेक ठिकाणी ऋग्वेद संहिता शाखांत परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. वाराणसी येथे श्रीकाशी-विश्वेश्वर नरेशांच्या राजवाड्यात मुखोद्गत ऋग्वेद शाखा पारायण केले. श्रीशारदापीठम् शृंगेरी येथे ऐतरेय ब्राह्मण आरण्यक संहिता क्रमान्त प्रथम श्रेणीत आणि घनांत परीक्षाही उत्तम श्रेणीत उत्तीर्ण. 'ऋग्वेदघनसूर्य', श्रीकरपात्रजी पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी अल्पवयातच सन्मानित करण्यात आले आहे.''

मानपत्र वाचनानंतर शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र व महादक्षिणा रु. ५१,०००/- देऊन अध्यक्षांच्या हस्ते वे.मू. श्रीनिधी स्वानंद धायगुड यांचा सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती म्हणाले, ''.... आज माझ्या जीवनात हा जो पुरस्कार सोहळारूपी आनंदाचा क्षण प्राप्त झाला आहे ही केवळ भगवंताची कृपा व श्री काकामहाराज यांच्यासारख्या थोरामोठ्यांच्या आशीर्वादामुळेच हे खरेतर शक्य झाले. वास्तविक माझी एवढा मोठा पुरस्कार स्वीकरण्याची योग्यता नाहीच तरीपण श्री काकामहाराजांनी माझ्यावरील आत्यंतिक प्रेमाने दिलेला हा प्रसादच आहे असे मी म्हणेन. मी माझी संहिता झाल्यापासून येथे सामूहिक संहिता पारायणास यावयास लागलो. तेव्हापासूनच श्री काकामहाराजांची माझ्यावर दृष्टी होतीच. येथे मी असे म्हणतो की ते अत्यंत बारकाईने पाहात असत व तेव्हाच म्हणजे साधारणतः पाच-सहा वर्षांपूर्वीच श्री काकामहाराजांनी माझ्या बाबांना सांगितले होते की याच्याकडे विशेष लक्ष द्यावे, हा नक्कीच घनपाठी होणार आहे. त्या वेळेस त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांचे ते शब्द 'स्वये बोलती वेद' असे हे महात्म्यांच्या मुखातून आलेले शब्द हे साक्षात




*पण्डित प्रवर एम् विनायकउडुपशर्मा यांचा सत्कार करताना पण्डित प्रवरडॉ. वंशीकृष्ण घनपाठी,*

## वेदमूर्ती - श्रीनिधी स्वानंद धायगुडे

*जीवमात्रांच्या शुभाशुभ कर्मांचे संचयन असणाऱ्या अग्रसंधानीसंज्ञक पुस्तिकेमध्ये परिगणित अशा अपूर्व पुण्याईने धायगुडे कुलामधील स्वाती व स्वानंद या दंपतीचे ठिकाणी जन्म प्राप्त करून लहान वयातच स्वगृहपाठशाळेमध्ये धायगुडेकुलोद्भव विद्वद्वरेण्य आपले पिताश्री वेदमूर्ती श्री. स्वानंद गुरुजींचे शिष्यत्व स्वीकारून ऋग्वेदाचे घनांत अध्ययन करून अनेक वैदिकमंडळींमध्ये आपल्या विद्वत्तेचे प्रकटीकरण करणाऱ्या वेदमूर्ती श्रीमान् श्रीनिधीशर्मा यांना सन्मानित करताना आमचे अंत:करण हर्षोल्हासित होत आहे. आपण स्वत:च्या निर्दोष अशा अस्खलित वाणीने कण्ठस्थ घनपारायण करून श्रीभगवान शिवशंकर आणि श्रीसीतारामचंद्र या देवतांना संतुष्ट केले आहे. श्रीसद्गुरू सहजानन्दसरस्वती स्वामी समर्थ महाराज यांना आपणासारख्या विद्वानांबद्दल मोठी आस्था होती. त्यांच्याच प्रेरणेने सेवामण्डळ श्रीवासुदेवानन्तसरस्वती स्वामी समर्थ महाराजांच्या जयंती उत्सवाला अनुलक्षून आपणास*

**'वेदकलानिधी'**

*ही पदवी व श्रीफल, महावस्त्र व रुपये एकावन्न हजार अतिशय आनंदाने प्रदान करीत आहोत. वेदभगवत्कृपेने आपणाला दीर्घायुरारोग्य व सच्छिष्य परम्परा प्राप्त होवो व आपला शारदीय कीर्तिचंद्र असाच नित्य वैदिक नभोमंडलावर झळकत राहो, अशी सद्गुरुचरणी प्रार्थना.*

**भवदीय,**

**अशोक रघुनाथ जोशी**

**विश्वस्त, श्रीसद्गुरू वासुदेवानन्तसरस्वती सेवामंडळ**

*शोभन - कार्तिक शु. १५, शक १९४६*
*दि. २७ नोव्हेंबर २०२४*



*पण्डित प्रवर एम्. विनायक उडुपशर्मा सत्काराला उत्तर देताना*




*वेदमूर्ति श्रीनिधी स्वानंद धायगुडे यांचा सत्कार करताना पण्डित प्रवरडॉ. वंशीकृष्ण घनपाठी,*



*वेदमूर्ति श्रीनिधी स्वानंद धायगुडे सत्काराला उत्तर देताना*

वेदोमुखच असतात. ते शब्द खरे होणारच यात तिळमात्र शंका नाही. माझी योग्यता नसतानाही अशा मोठ्या गुरुजींच्या आशीर्वादानेच या मंदिराशी माझे संबंध आहेत व माझ्यावरील आत्यंतिक प्रेमामुळेच श्रीकाकामहाराज मला आशीर्वाद देण्याकरता तुळशीबाग राममंदिरात माझ्या मुखोद्गत घनपारायणाला स्वतः प्रत्यक्ष आले, यापेक्षा माझ्या जीवनातील भाग्याचा क्षण कोणताच नव्हता. तद्वतच आजचा हा क्षणपण माझ्या जीवनात अमूल्य असाच आहे. मला हा जो सर्वात मोठा पुरस्कार प्राप्त होत आहे, याकरिता मी काका महाराजांच्या चरणी सदैव ऋणी राहीन व आपले असेच आशीर्वाद माझ्या पाठीशी कायम राहोत एवढी प्रार्थना करतो व थांबतो.''

त्यानंतर समारंभातील मुख्य कार्यक्रम म्हणजे वासुदेवानन्त सरस्वती सेवामंडळातर्फे ज्या वैदिक तथा अन्य पाठांतराच्या परीक्षा घेण्यात आल्या त्याचे निकाल व स्पृहणीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्र व पारितोषिक वितरण समारंभ सुरू झाला.

वैदिक पाठांतर स्पर्धेमध्ये, संपूर्ण ऋग्वेद संहिता परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला देण्यात येणारा वेदमूर्ती लक्ष्मण विनायक सप्रेगुरुजी पुरस्कार कु. शर्व श्रीहरी धायगुडे यांना देण्यात आला. मानपत्र आणि रु. २५००/- असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याज्ञिक कर्मकांड परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला श्री. विश्वनाथ मिराशी पुरस्कृत वेदमूर्ती लक्ष्मण विनायक सप्रेगुरुजी पुरस्कार देण्यात येतो. या वर्षी हा पुरस्कार कु. राहुल जोशी यांना मिळाला. तसेच गुरुकुल पद्धतीने चालणाऱ्या वेद पाठशाळेला देण्यात येणारा पुरस्कार वे.मू. मुरवणेगुरुजी यांच्या वेदशाळेला देण्यात आला.

त्यानंतर अध्यक्षीय भाषण झाले. अध्यक्ष पण्डित प्रवर डॉ. वंशीकृष्ण घनपाठी जी आपल्या भाषणात म्हणाले, ''... भगवान दत्तात्रेय की असीम कृपा से यहां भगवान दत्तात्रेय का संचार है। हम महाराष्ट्र में वेदवाणी का दर्शन कर रहे हैं, उसमें एवं यजुर्वेद में एक बहुत शक्तिपूर्ण मंत्र है।

इसके पद की व्याख्या से हमारे आज के पंधरा मिनिट का आरंभ करते हैं। आजकल मंत्रों का अभ्यास कैसे करना है, ऐसी एक चिकित्सा, एक चर्चा जारी है। कुछ लोग बोलते हैं, हमें हर दिन लोगों के संदेश मिलते हैं, इस में पांच से दस एक जैसे ही होते हैं। गुरुजी हम इंटरनेट द्वारा पढते हैं, नहीं तो हम यूट्यूब द्वारा सीखे हैं, आप इसे मान्यता दे दीजिए। इसे भी स्थान मिलना चाहिए, आप भी यूट्यूब चैनल क्यों नही खोलते हैं? तब ऐसा लगता है कि जिस दिन हमारी ऋषि परंपरा में हमारे अध्ययन की एक पारंपरिक व्यवस्था बनाई गई, उस समय में तो इतनी एडवांस टेक्निक नहीं थी, पुरोगती इतनी नहीं थी इसिलिए एक छात्र को सामने बिठाकर बोलना पडता था। उसे गुरोमुखोच्चारण अनुच्चारणं पद्धति कहा गया। ऐसी परंपरा थी। पहले किसी को कोई खबर भिजवानी तो एक आदमी को भेजा जाता था। राजाओं ने कबूतर द्वारा ख़बर भेजने की व्यवस्था शुरू की। आज कल सभी लोग व्हॉट्सएप के युग में हैं। ऐसे ही हमारा संभाषण होता है। ऐसे ही हर एक व्यवस्था में इतनी प्रगति हुई है, पुरोगती हो गई। केवल वेद व्यवस्था ही पीछे रह गई है। ऐसी आपति बहुत लोगों को होती है। हम दुनिया में हर जगह देखते हैं। उन लोगों से हम केवल इस विचार में पिछड़ गए हैं। क्या यह ठीक है? और कई महान व्यक्ति दुनिया में कई जगह पर मिलते हैं, वे यूट्यूब द्वारा एमपी थ्री प्ले शुरु करते हैं, वेद का अध्ययन ऐसे ही करते हैं, बहुत लोग मिलते हैं। यह एक उद्योग की तरह बन रहा है लेकिन हमारे देश में गुरु के सामने बैठकर अध्ययन करनेवाले शायद अल्पसंख्यक ही बन जायेंगे। हमारा अध्ययन तब तक संपन्न नही होता है जब तक एक आचार्य हमारी वाणी को पूरा सुनकर प्रमाणित नहीं करते हैं, तब तक हमारा अध्ययन अधूरा ही रहता है। महाकवि कालीदास ने कहा है - 'आपरितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम्। बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः।।' जब तक एक विद्वान हमारी पूरी वाणी को प्रमाणित नहीं करता है तब तक ज्ञान अधूरा, अप्रमाणित ही रहता है। न्यायशास्त्र में भी कैसा होता




*वेदमूर्ती लक्ष्मण विनायक सप्रेगुरुजी पुरस्कार (संपूर्ण ऋग्वेद संहिता परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण) स्वीकारताना कु. शर्व श्रीहरी धायगुडे*




*वेदमूर्ती लक्ष्मण विनायक सप्रेगुरुजी पुरस्कार (याज्ञिक कर्मकांड परीक्षेत प्रथम क्रमांक) स्वीकारताना कु. राहुल जोशी*

है कि उच्चार होना ही चाहिये प्रमाण कैसा होता है, ज्ञान कैसा होता है, इसका थोडा-बहुत विचार करना ही पडेगा। यह परीक्षा देने के दो तरीके होते हैं। एक जो दूसरे को पराजित करने के लिए प्रयास करता है और दूसरा पूरे विश्व को बदलने के लिए और उसकी विद्वत्ता को बाहर लाने के लिए जो प्रयास करता है, क्या दोनों ठीक हैं? भगवान की कृपा ही इसका उत्तर देगी। हम यह बात क्यों बता रहे हैं क्योंकि हमें नीतिशास्त्र में एक वचन ज्ञात होता है

'नागुणी गुणिनं वेत्ति गुणी गुणिषु मत्सरी । गुणी च गुणरागी च सरलो विरलो जनः ।।' बहुत आसान बात है। गुणी मतलब जिसके पास गुण हैं, अगुणी मतलब जिसके पास गुण नहीं हैं। जिसके पास गुण हैं, उसको वह नहीं पहचान सकता जिसके पास गुण नही हैं। अगर मैं अभी तेलुगु भाषा में भाषण देता हूं, तो आप तेलुगु भाषा नहीं जानते हैं, तो समझ नहीं पायेंगे। अगर मैं हिंदी में बात करता हूं, तो आप समझेंगे। अगर यह गुजराती में, कश्मिरी में बात करते हैं, तो हम नहीं समझ पायेंगे। इसी प्रकार अगर कोई बहुत गुणवान व्यक्ति कुछ बात करता है, कुछ मंत्र बोलता है, तो इसकी जानकारी उसके पास होती है। 'विद्वानेव विजानाति विद्वज्जन परिश्रमं ।' जिस प्रकार एक माता ही दूसरी माता की व्यथा समझ सकती है, बाकी लोग नहीं समझ पायेंगे, उसी प्रकार हमारी वाणी प्रस्तुत करने के लिए एक विद्वान ही दूसरे विद्वान को कितनी बाधा उठानी पड़ी और उसका अध्ययन करने में कितना क्लेश हुआ, यह सब वही पहचान सकता है।

'नागुणी गुणिनं वेत्ति गुणी गुणिषु मत्सरी ।' जिसके पास गुण है उस गुण को मानने के लिए भी बहुत लोग तैयार नहीं होते हैं, मैंने तो इतने साल मेहनत की है, एक अच्छा काम किया है, कोई आपत्ति ही नहीं है लेकिन यह आपत्ति समझनेवाले कुछ लोग होते हैं।

'गुणी गुणिषु मत्सरी।' लोग कैसे होने चाहिए और कैसे लोगों को हमें कैसे पकडना चाहिए? 'गुणी च गुणरागी च सरलो विरलो जनः।' उसके पास गुण के साथ-साथ वात्सल्य भी होना चाहिये। अगर कोई गुणवान लोग विद्वान लोग हो तो उनका अभिनंदन करने के लिए सौजन्य होना चाहिये।

सरल स्वभावी जन हर जगह नहीं मिलते हैं, ऐसे लोगों को पकड़कर मंच पर लाना एक बहुत बडा प्रयास है इसिलिए हमारे गुरुजन हमें यह बोले। गुरुजी बताते हैं कि हमें पहले धर्म का आचरण करना चाहिए, आचरण करते करते धर्म के प्रकाशन के लिये भी हमें काम करना चाहिये। उन्होंने बहुत अच्छा बताया। अगर हमें दुनिया बहुत अच्छी चाहिये तो हमें क्या करना चाहिए। हमें एक नियमावली बनानी चाहिए कि धर्म क्या होता है, धर्म मतलब एक पुस्तक नहीं है। एक पुस्तक से पूरी दुनिया कैसे चल सकती है। आपको एक दृष्टांत देता हूं। हम सभी लोग रास्ते पर चलते हैं वामपंथी। आनेवाले लोग राइट साइड पर होते हैं। यह एक सामान्य नियम है। अगर इस नियम को हटा दें, तो क्या होगा? दुर्घटना ही होगी। ऐसे ही धर्म का पालन करना है। सभी को अपनी-अपनी धर्म व्यवस्था और आश्रम व्यवस्था का पालन करना है।

अगर आज किसी घनपाठी, किसी न्यासी को हम इस अध्यक्ष पद पर बिठाते हैं, तो उसका नंबर जो भी आता है, सत्य पूर्ण हो सकता है, गलत भी हो सकता है। व्यवस्था के हिसाब से इसे प्रमाणित करने का हमारे यहां तो पचास साल, सौ साल के बाद भी हम नहीं छोडते हैं। पचास साल, साठ साल, अस्सी साल इतनी छोटी उम्र में आयुष्य में हम पूरे धर्म को जान सकते हैं क्या? आज तो नए धर्म की रचना के बारे में छोडिये लेकिन यह धर्म वचन जो है, इसको पढने के लिये, करने के लिए भी इतनी आयु पर्याप्त नहीं है इसिलिए हमारे ऋषी मुनी जो दीर्घायु हैं उनसे प्रकाशित हुआ।

जिनके दर्शन से हमारे वेद राशि मिले हैं, उस वेद राशि का प्रकाशन कौन करेगा? अगर सभी लोग सौभाग्य संपन्न सुख शांति से जीना चाहते हैं, तो हमारे वेद का प्रकाशन होना चाहिये। ऐसा प्रकाशित जो करते हैं पहला नमन उनका ही होना चाहिये। इसके अलावा किसको हम मदद करते हैं इसिलिए वेद का प्रकाशित करने



*पण्डित प्रवरडॉ. वंशीकृष्ण घनपाठी,*

वालों को नमस्कार करना चाहिए और परीक्षा क्या होती है, परीक्षा की जरूरत क्या है? परीक्षा की आवश्यकता सिर्फ इतनी है कि अगर एक व्यक्ति आकर बोले कि हमें पाठ है, और गलत भी हो सकता है।

'आचार्य मुखोच्चारणं' हमारे आचार्य ऐसे ही बोले हैं हर एक यहां पाठांतर हो वह घनपाठ होता है। ऐसे दस, बीस, पच्चीस, एक हजार, एक सौ पाठ निकले तो इसको हम प्रमाण बोलेंगे। कुछ लोग देवी बोलते हैं, कुछ लोग दैवी बोलते हैं, दैवी है, देवी है, देवा है क्या है। शायद इसिलिए हमारी परीक्षा की परंपरा सौ-दोसौ साल पहले शुरू हुई। तब तक कुछ ना कुछ व्यवस्था ऐसी थी की अध्ययन पूरा होने के बाद किसी विद्वान के पास बैठना है और संपूर्ण व्यवस्था सुनवाना है। श्रवणं। इसके बाद जब वह गुरुजी भी विद्या को मानते हैं। अब तो गुरुजी भी बहुत बिझी हो गये हैं, सभा में होते हैं, कार्यक्रम होता है और किसी के पास समय नहीं होता है और इनसे भी अधिक बिझी है हमारे छात्र। इनके सत्रह साल में, अठारह साल में यह प्रमाणपत्र हो जाता है, याज्ञिकी हो जाती है, शादी के लिए जल्दी हो जाती है और कोई भी आज अक्षर से ग्रहण करते हैं। अभी श्रीनिधी को देखकर मुझे थोड़ी जेलसी हो रही है क्योंकि इसकी उम्र अभी २० भी नहीं हुई और इसमें ही अक्षर ग्रहण हो रहा है।

ऐसी चार दशा है, पहली दशा तो बीस साल में ही खत्म कर दी है। इसके बाद क्या करना चाहिए। अर्थ ग्रहण की दशा में उसका प्रयास करना चाहिए। इसका नाम पिता ने बहुत ही अच्छे-से सोचकर रखा होगा श्रीयां निधीः, श्रीनिधीः ! साक्षात नारायण को श्रीनिधी बोलते हैं। देखिये श्री क्या होती है, बैंक में एक करोड रुपया, दस करोड रुपया है और जिसके पास बैंक लॉकर मे सोना है तो वह श्री हो जाती है क्या? हम तो ऐसा ही समझते हैं लेकिन वेद ऐसा नहीं समझते।

जिसकी एक्सपायरी डेट नहीं होती है, अंत दिन नहीं होता है, ऐसी कोई विद्या होती है तो उस विद्या का नाम श्री है। ऐसा श्री को बहुत प्राप्त करना है। किसी वेबसाईट की जरूरत नहीं पड़नी चाहिए, एक वाक्य बोलो यह कहां है, कैसा हुआ, ऐसे तुरंत बोलनेवाले यह विद्या होती है, वही श्रीनिधी का मतलब होता है। यह और भी सार्थक हो जायेगा जब हम इसके लक्षण देखते हैं। आज हम इसी सभा में दो व्यक्ति को हम यहां देख सकते हैं। एक है लक्ष्य के निधी लक्ष्य क्या होता है, वेद होता है कुछ लोग कहते हैं कि शिक्षाशास्त्र कैसा है, इसका कैसे हो गया। इसिलिये हमें क्या बोलना चाहिए पिता जैसा पुत्र है या पुत्र जैसा पिता है। सभी को बोलना चाहिये कि पिता जैसा ही पुत्र है। ऐसे ही वेद है पितृस्थान पर है । उसका ही एक अवयव है व पुत्रस्थान है । हमारी कोशिश से हमारी पुरुष बुद्धि से कुछ किया हुआ उसको पौरुषेय बोलते हैं, ऐसे पौरुषेय में कभी-कभी अपने राग और द्वेष का निवेष हो सकता है इसिलिए वह गलती से भी कभी-कभी हो सकती है लेकिन स्वाभाविकता, प्राकृतिक जो होता है वही वेद है इस वेद में दोष की संभावना ही नहीं है। ऐसा वेद का लक्षण है। अगर ये वेदपाठी कभी कभी त्रुटि से कुछ गलती करें, इस गलती को ठीक करने के लिए रक्षण है, लेकिन वेद को ठीक करने के लिए वेद का पाठ ही

**डॉ. वंशीकृष्ण घनपाठी यांचा परिचय**

- श्री गणपती सच्चिदानंद स्वामीजी, म्हैसूर यांचे शिष्य
- विश्वस्त, अवधूत दत्तपीठम्
- मुख्य कार्यकारी - श्रीदत्त व्यंकटेश्वर आगम विद्या केंद्र व मंदिर
- संपादक - सनातन गुरू संप्रदाय प्रतिष्ठान आणि धर्मपोषणम्
- श्रीपाद श्रीवल्लभ क्षेत्र, पीठापूर, श्री दत्तमुक्ती क्षेत्र, राजमुंद्री यांचे संचालक
- राजराजेश्वरी मंदिर, विजयवाडा यांचे सल्लागार
- कर्नाटक संस्कृत विद्यापीठ, बेंगलुरू येथे वैदिक संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक
- इंग्रजी, संस्कृत, तेलगू, कन्नड हिंदी या भाषांवर प्रभुत्व
- ऋग्वेद, यजुर्वेद (तैतरीय शाखा), सामवेद (कौथुम शाखा), अथर्ववेद, वेदभाष्य, श्रौत, संस्कार साहित्य, व्याकरण मीमांसा, अद्वैतवेदांत यांचे अध्ययन
- एस. व्ही. वैदिक विद्यापीठ, तिरुपती यांच्याकडून डी. लिट.
- पी. एस. आर. तेलुगू विद्यापीठाकडून डॉक्टरेट प्रदान
- साठ विद्यार्थ्यांना चार वेदांचे अध्यापन
- दत्त शतकम्, चरणव्युह, स्मार्त दर्शन अशा अनेक ग्रंथांचे लेखन, संकलन

करना होगा। यहां एक जगह पर लक्ष का विद्वान श्रीनिधी उपस्थित है, दूसरे हमारे विनायक गुरुजी ये लक्षण के विद्वान है ऐसा लक्ष्य लक्षण के रूप में सभी प्राप्त हैं। हमारा ये सुझाव और भगवान से प्रार्थना है कि ऐसे विद्वान अपने लक्ष को और संपुष्ट करने के लिए, पुष्टि करने के लिए, अर्थ को जानने के लिए, अच्छे व्याकरण का अध्ययन करें। अगर महाराष्ट्र में कुछ कमी है, तो मैं सिर्फ यही कमी समझता हूं कि जो विद्वान हैं, उनकी ही कमी है। भगवान ने इतना अच्छा आयुष्य दिया है, और भी देगा और यह वेदार्थ वक्ता भी बनें और हमारे साथ इसी मंच प्रशस्त करें। इसिलिए आप लोगों को हमारे शहर से कोई सन्मान प्रदान करते हैं, हमारा योगदान भी दस हजार रुपये हुआ इससे काम नही होगा आपको।

हमारी यहां उपस्थित सभी भक्तगण से याचिका है कि आप वेद के मंत्र का भी आस्वाद लेने की आदत बनाइए, जैसा आप वेदमंत्र का श्रवण करने की आदत का आनंद लेते हैं वैसे ही। इसी विचार का हम सभी लोग, हमारे बच्चे इस पर भी थोडा ध्यान देंगे। ऐसी बहुत महत्वपूर्ण संस्था जो चलाते हैं उनसे भी थोड़ी हमारी विनती है कि जो वेदार्थ पढना चाहते हैं, उनका थोडा सम्मान और समर्थन आप कीजिए, तो महाराष्ट्र में यह कमी पूरी हो जायेगी। ऐसा बोलते हुए हम दत्तात्रेय भगवान एवं महाराज के चरण कमलों में हमारी विनंती एवं आशा यहां प्रस्तुत करते हैं कि हमारी वेद परंपरा ऐसे ही बढ़े, आगे बढ़ती रहे।''

वे.मू. निगुडकर यांनी आभारप्रदर्शन केल्यानंतर वरयाचना पठणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सायंकाळी तुलसी विवाह साग्रसंगीतपणे अत्यंत उत्साहात साजरा झाला.

**शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर २०२४; कार्तिक पौर्णिमा, शक १९४६ श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे जयंती दिन**

श्रीबाबामहाराजांचा जयंती उत्सव श्रीमहाराजांनी प्रस्थापित केलेल्या परंपरेप्रमाणे अत्यंत भक्तिभावाने साजरा झाला. सकाळी भक्तगणांचे सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषदपठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन आदी कार्यक्रमानंतर श्रीबाबांच्या मंदिरात ह.भ.प. पद्मनाभ व्यास यांनी जन्मोत्सवाचे कीर्तन केले. जन्मोत्सवाचा सोहळा अत्यंत भक्तिभावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. त्यानंतर महाप्रसाद झाला. सायंकाळी त्रिपुरपूजन झाल्यावर 'श्रीं'ची रथातून समाधिमंदिरात पालखीप्रदक्षिणा काढण्यात आली. भक्तगणांनी अत्यंत उत्साहाने नाचत, भजन करीत या सोहळ्यात भाग घेतला.

**शनिवार, दि. १६ नोव्हेंबर २०२४; कार्तिक वद्य १, शक १९४६**

सकाळी भक्तगणांचे सामुदायिक नामस्मरण, सामुदायिक उपासना, उपनिषदपठण, लघुरुद्राभिषेक, आचार्य पद्मनाभ व्यास यांचे प्रवचन आदी कार्यक्रमानंतर, सायंकाळी डॉ. काशीनाथ देवधर यांचा सत्कारसोहळा झाला. त्यानंतर रात्रौ १०.०० ते २.०० या काळात लळीताचे कीर्तन होऊन प्रसादवाटपानंतर श्रीबाबांचा धावा पठण

## पाठांतर स्पर्धा पारितोषिक विजेते



*कु. अवंती माळवदकर*



*कु. सोहा मिराशी*



*कु. अवधूत नाईक*



*कु. ईशान मालवणकर*



*कु. चैत्राली काळे*



*कु. श्रावणी काळे*



*कु. पूर्वा जोशी*



*कु. भार्गव मंचेकर*



कु. प्रभव जोशी



कु. प्रभव मिराशी



कु. अनुज शहापुरे



कु. समर्थ नातू



कु. चिरायू कुलकर्णी



कु. स्पृहा काजरेकर



कु. हर्षवर्धन मिराशी



कु. चिन्मय खाडिलकर



कु. नीरजा गुप्ते



कु. योगिनी पराडकर



डावीकडून – पण्डित प्रवर एम्. विनायक, वे.मू. माधव परांजपे,
श्री अशोकराव जोशी, पण्डित प्रवरडॉ. वंशीकृष्ण घनपाठी,
श्री. विकासराव वालावलकर, वे.मू. मंदार फडके, वे.मू. मंदार क्षीरसागर



जयंती उत्सवानिमित्ताने शृंगारलेले श्रीबाबामहाराज यांचे मंदिर




श्रीबाबांच्या जयंती उत्सवानिमित्ताने शृंगारलेले श्रीसहजानंद सरस्वतीमहाराज यांचे मंदिर





'माध्यान्ही रवि होता, गतघटि सोळा अधीक अर्ध घटी । भरणीं नक्षत्रावरि हरि जन्मे सौम्यशाच बुधवारीं ।।' ह.भ.प. पद्मनाभ व्यास जन्माख्यान सादर करताना



'शुद्ध अंतरीं तसा बाळ जो कीं । तया न्हाणी कवण इया लोकी । जयाचेनी शुद्धता तिन्हीं लोकीं । दास म्हणे वंदुयां चरणकमळीं ।।'






'आनंदाचें ओंतिव अंतर्बाह्यहि अतीव आनंद । निजानंद भेटीनें प्रकटे जीवासि पूर्ण आनंद ।।'



'धरुनी अवतार युगायुगीं । धर्म रक्षिसी वेगीं । मिळवुनि भक्तांसी निजरंगीं । नाचसि त्यांचे संगीं (रंगी) ।'



'चरणस्पर्श होतां त्याचा । पाश तुटताहे मायेचा । भेटे आत्माराम साचा । नेतो अविनाशी मुक्तिपदा'



त्रिपूरपूजन




तुलसीविवाह




*मंत्रजागर*



*पालखी प्रदक्षिणा*



*मंदिरांचे स्थपती श्री. नंदकुमार आणि श्री. शशीवर्धन श्रीकाकांसमवेत रंगून नाचताना*



*'ब्रह्मानंदी लागली टाळी। कोण देहाते सांभाळी ।।'*




*लळीत – सद्गुरूंच्या पादुकांचे पूजन*



*लळीत – नारद पूजन*



*'द्यावा प्रसाद ताटीचा । विडा आपुले हातीचा।'*



*'अंतीं एकची विनवणी । सेवा घे मजकडुनी ।'*

**मालक, मुद्रक, प्रकाशक** : श्री. विकासराव वालावलकर यांनी अमोल असोसिएट्स, आर्यभूषण भवन, पुणे ४११ ००४ येथे छापून श्रीबाबामहाराज सहस्रबुद्धे समाधिमंदिर, ९३७ डी, ज्ञानेश्वर पादुका चौकाजवळ, शिवाजीनगर, पुणे – ४११ ०१६ येथून प्रकाशित केले.
**संपादक** : श्री. विनायक चिंतामण पराडकर, अध्यक्ष, श्रीसद्गुरू वासुदेवानंतसरस्वती सेवामंडळ. दूरभाष क्र.: ०२०–२५६५५०२१